# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे — ४११००७

**Savitribai Phule Pune University**
Ganeshkhind, Pune - 411007

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

दूरध्वनी क्रमांक : 020-25621205
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:- मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या तक्रारीबाबत**

संदर्भ : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.ससं/पुवि/मुलींना मोफत शिक्षण दि. ०८/०७/२०२५.

या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग/संकुल यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.ससं/उशि/पुवि/मुलींना मोफत शिक्षण दि. १८/०६/२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ०८.०७.२०२४ नुसार व्यावयायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC), इतर मागास प्रवर्गातील (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात आलेले आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.ससं/उशि/पुवि/मुलींना मोफत शिक्षण/दि.१८.०६.२०२५ अन्वये सर्व शासकीय,शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विना अनुदानित महाविद्यालये यांना मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तसेच उच्च शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणारी राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या योजनेअंतर्गत मुलींना मोफत शिक्षण योजना राज्यात राबविण्यात येते. सदरहू योजनेसाठी उच्च शिक्षण विभागाअंतर्गत राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा दि. ०७.१०.२०१७ व १०.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमांना मुलींना मोफत शिक्षण योजना लागू आहे.

दिनांक १९ जुलै, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये उक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना सूचना दिलेल्या आहेत. उक्त सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज देण्यात येईल व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्था विरूध्द कारवाई करण्यात येईल. तथापि उच्च शिक्षण संचालनालयाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित मुलींना मोफत शिक्षण योजनेसाठी काही महाविद्यालये उपरोक्त नमूद शासन निर्णयांची अंमलबजावणी करीत नसल्याबाबत, तसेच काही महाविद्यालये मुलींकडून संपूर्ण फी

आकारणी करीत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची सर्व महाविद्यालय, संस्था व विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी नोंद द्यावी. मुलींना मोफत शिक्षण योजनेसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे या कार्यालयास सादर करावा.

(श्रीमती सुनिता हजारे)
उपकुलसचिव,

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/१८०८ }
दिनांक :१६/०७/२०२५ }

सोबत:– शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्या दिनांक ०८/०७/२०२५ रोजीच्या प्रत.

**प्रत:**

१ मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ

२ मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ

} यांना विनंती की वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावा.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in
फोन नं 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. – ससं/उशि/पुवि / मुलींना मोफत शिक्षण/ दिनांक : 08.07.2025

**परिपत्रक**

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : -** मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या तक्रारीबाबत . . .

संदर्भ : -
1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ. 2024/ प्र.क्र. 105/ तांशि-4 दि. 08.07.2024.
2. शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ – 2024/ प्र.क्र. 207 / तांशि – 4, दि. 19.07.2024
3. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. 07.10.2017 व दि . 10.10.2024.
4. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं / शिष्यवृत्ती / मु. मो. शि . E – 971006 दि. 18.06.2025.
5. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ससं/उशि/पुवि / मुलींना मोफत शिक्षण/ दि. 18.06.2025
6. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं -शिष्य /2025-26 / तक्रार / E – 971006 दि. 02.07.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. 08.07.2024 नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS), समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), इतर मागास प्रवर्गातील (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 50 टक्के ऐवजी 100 टक्के लाभ मंजूर करण्यात आलेले आहे. याबाबत या कार्यालयाच्या संदर्भिय परिपत्रक क्र. 5 अन्वये सर्व शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित ( टप्पा अनुदान ) व कायम विना अनुदानित महाविद्यालये यांना कळविण्यात आले होते.

तसेच उच्च शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणारी राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या योजने अंतर्गत मुलींना मोफत शिक्षण योजना राज्यात राबविण्यात येते. सदरहू योजनेसाठी उच्च शिक्षण विभागा अंतर्गत राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शि ष्यवृत्ती योजनेचा

दि. 07.10.2017 व दि. 10.10.2024 रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमांना मुलींना मोफत शिक्षण योजना लागू आहे.

दिनांक 19 जुलै, 2024 रोजीच्या शासन परिपत्रकान्वये उक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

1. सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना 100 टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे त्यांचेकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांना 50 टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. त्यांचेकडून फक्त 50 टक्के शिक्षण शुल्क घेऊन त्यांना प्रवेश देण्यात यावा.

2.शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनांतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

उक्त सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज देण्यात येईल व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थां विरुध्द कारवाई करण्यात येईल. तथापि उच्च शिक्षण संचालनालया अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांकरीता प्रवेशित मुलींना मोफत शिक्षण योजनेसाठी काही महाविद्यालये उपरोक्त नमूद शासन निर्णयांची अंमलबजावणी करीत नसलेबाबत, तसेच काही महाविद्यालये मुलींकडून संपूर्ण फी आकारणी करीत असलेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची सर्व महाविद्यालय, संस्था व विद्यापीठांनी नोंद घ्यावी. मुलींना मोफत शिक्षण योजनेसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 10-07-2025 15:04:02

(डॉ. अशोक उबाळे )
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 16 यांना माहितीस्तव सविनय सादर.